ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - IV OCTOBER - DECEMBER - 2020

ENGLISH PART - II / MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** **(www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय शिक्षणाच्या गुणवत्तावर जागतिकीकरण आणि खाजगीकरणाचा प्रभाव<br>**अमिना शेख**<br>**डॉ. सीमा कांबळे** | १-६ |
| २ | मल्टिमिडियावर आधारित शिक्षण आणि समाज<br>**जयश्री संजय दोडके** | ७-११ |
| ३ | संप्रेषण माध्यमांचा शिक्षणात उपयोग व जनसंपर्क माध्यम<br>**नितिन एकनाथ सावंत** | १२-१९ |
| ४ | बहुविध व सामाजिक माध्यामांचे शिक्षणप्रणालीतील योगदान<br>**प्रज्ञा भाऊराव पवार**<br>**डॉ. सीमा कांबळे** | २०-२४ |
| ५ | माध्यमिक स्तरावरील बंजारा समाजातील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या कौटूंबिक परीस्थितीचा तुलनात्मक अभ्यास<br>**रुपाली लक्ष्मण राठोड**<br>**डॉ. एस. जी. बूटे** | २५-३० |
| ६ | शिक्षणाचे नवे प्रवाह ई - प्रवाह विकास<br>**सारिका नरिमन ठाकूर** | ३१-३७ |
| ७ | उच्च शिक्षण घेताना ग्रामीण भागातील मुलींना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना<br>**कु. सारिका जनार्दन उलवेकर** | ३८-४० |
| ८ | शिक्षण आणि समाजमाध्यमे<br>**प्रा. डॉ. दयाराम दुधाराम पवार** | ४१-४४ |
| ९ | शिक्षणातील नवे प्रवाह<br>**जयश्री बाबुराव सरोदे** | ४५-४८ |
| १० | इयत्ता सहावीच्या सामान्य विज्ञान पाठ्यपुस्तकाचा विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे** | ४९-५२ |

**NAAC sponsored**

**Two Day Online National Seminar**

**on**

# "Emerging Trends in Educational and Research Quality"

**Oraganised by**

**[Internal Quality Assurance Cell (IQAC)]**

Adarsh Shikshan Prasarak Mandal's

**Shri.Bapusaheb D. D. Vispute College of Education, New Panvel**

In association with

**National Assessment and Accreditation Council (NAAC)**

5th and 6th December 2020.

CONVENOR
**Dr. Seema Nivrutti Kamble**
Principal,
Shri. Bapusaheb D. D. Vispute College of Education, New Panvel

SPECIAL ADVISORY SUPPORT
**Prof. Dr. Sunita Magre**
I/c Director,
Thane Sub Campus, University of Mumbai

समाज माध्यम हे एक विज्ञान आहे. त्याचा वापर अभ्यासपूर्वक करावयास हवा. माध्यमांचे स्वरूप लक्षात घेवून त्याचा उपयोग करता येणे महत्वाचे आहे. शैक्षणिक क्षेत्रात समाज माध्यमांचा विकास मागील दोन दशकामध्ये जास्त प्रमाणात झालेला दिसून येतो. शाळेत अथवा महाविद्यालायात कोणत्याही गोष्टी मध्ये अडचण आल्यास लगेच इंटरनेटचा वापर करून विद्यार्थी आपल्या प्रश्नांचे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. समाज माध्यमामुळे कोणत्याही गोष्टींच्या मुळाशी जाऊन त्याचे उत्तर शोधणे आज सोपे झाले आहे. म्हणजेच समाज माध्यमामुळे जग फार लहान झाले आहे असे वाटते . समाज माध्यमांचा वापर महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यामध्ये जास्त आढळून येतो. आजच्या पिढीतील महाविद्यालयीत असा एकही विद्यार्थी आढळणार नाही की, ज्यांच्याजवळ स्मार्ट फोन नाही विद्यार्थी रोज समाज माध्यमांच्या वेगवेगळ्या ॲप्सशी कनेक्कटेड असतात. त्यात प्रामुख्याने मिडीयावरील माहिती, कधी शैक्षणिक क्षेत्रासंबंधी माहिती गोळा करणे , कधी मनोरंजन किंवा कधी नवीन माहिती शोधणे ह्यासारख्या इतर बाबींचा देखिल समावेश आहे समाज माध्यमे केवळ विद्यार्थ्यांना माहिती मिळवण्यापुरतेच मर्यादित नसून त्याद्वारे विद्यार्थ्यांना आपले सहसंबंध प्रस्थापित करता येतात. फेसबुक, ट्विटर तसेच अनेक वेगवेगळ्या साईटच्याद्वारे विद्यार्थी आपला एकाकीपणा घालवून इतरामध्ये मिळून राहू शकतात. त्याचा विशेष फायदा जे मुले अबोल आहेत किंवा कमी बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात होतो अशी मुले समोरासमोर बोलण्यास संकोच करतात . तेंव्हा जगांशी व इतरांशी जोडून राहण्यास त्यांना समाज माध्यमांची मदत होते . आज उपलब्ध असलेल्या विविध समाज माध्यमाद्वारे पालक विद्यार्थी व शिक्षकाच्या ज्ञानामध्ये वृध्दी होत जाते . त्यातून ते इतरांपर्यंत ज्ञान पोहचवू शकतात. शाळेचा विचार केल्या शाळा सोशल मीडीयाद्वारे आपल्या शाळेच्या विविध सकारात्मक बाबी सोशल मीडीयाद्वारे अनेक व्यक्तीपर्यत पोहचवितात. तसेच काही क्षणामध्ये एखाद्या संस्थेला व वक्तीला लगेचच अनेक लोकांपर्यत होपचता येते .त्यासोबतच लोकांच्या प्रतिक्रीया देखिल समजतात. कॉसमाज केवळ सोशल मिडीयावरील बाबी , माहितीचे स्वागतच करत नाही तर जर एखादी माहिती विसंगत अथवा तेड निर्माण करणारी असेल तर त्यावर नकारात्मक प्रतिक्रीया देखिल उमटतात . त्यामुळेच सोशल मीडीयाचा शैक्षणिक प्रगतीसाठी सकारात्मक पणे वापर करणे आवश्यक आहे . त्यामुळेच ॲल्वीन टॉपलर ह्यांनी आपल्या 'तिसरे जग' ह्या पुस्तकात लिहलेले आहे कि 'कृषी क्रांती, उद्योग क्रांती' यापेक्षाही माहिती क्रांती मानवी जीवनाला कलाटणी देणारी घटना आहे.

**सोशल मिडीयाचे महत्व**

पूर्वीच्याकाळी माहितीच्या साधनाची मर्यादा येत असल्यामुळे ठराविक ठिकाणी अथवा भौगोलिक क्षेत्रापुरचेत माहिती, ज्ञान राहत होते. एखाद्या शाळेमधील विविध चांगले उपक्रम देखिल त्यापुरतेच मर्यादीत राहत होते. कालांतराने ते काळाच्या पडद्याआड होत असे .परंतू आज सोशल मिडीयाद्वारे लगेचच आपण अशा चांगल्या बाबीत ,उपक्रम ,प्रयोग नाविण्यताचा संग्रह करुन इतरांपर्यंत क्षणात पोहचू शकतो . अशावेळी त्या बातमीचे कौतुक देखिल केले जाते. व इतरांसाठी आदर्श महणून सुध्दा उभे राहते .

**विद्यार्थी विकासास उपयुक्त**

सोशल नेटवर्क साईटमुळे विद्यार्थ्यांमधील नेतृत्व कौशल्य , प्रोत्साहन देणारे , तसेच पूर्वनियोजन आणि विविध सामाजिक कार्यक्रम घडवून आणण्यासाठीचे आयोजन करण्याचे एक चांगले माध्यम होय . तसेच समाज माध्यमांच्या टूल्स आणि नेटवर्कींग साईटमुळे विद्यार्थ्यांना आपले मत मांडण्यास वाव मिळतो. एखाद्याच्या

सृजनशिलतेचे कौतुक किंवा एखादा विद्यार्थ्यामधील कौशल्ये ह्याद्वारे सादर करुन त्याचा विकास घडवून आणण्यास प्रोत्साहन दिले जाते. समाज माध्यम आजच्या जगण्याचा एक अविभाज्य घटक आहे सामाजिक गरजेतून एकत्र येवून तंत्रज्ञानाचा वापर करणे किंवा तंत्रज्ञानाद्वारे सामाजिक परिवर्तन किंवा गरज भागवणे हे आजचे गणित होत चालले आहे ह्याचाच अर्थ प्रत्येक व्यक्तिस मानसिक समाधान , आधार देण्याचे कार्य ह्या समाज माध्यमा द्वारे होत असतो . तसेच अडचणीवर मात करण्याची ताकदही ह्याद्वारे विद्यार्थ्यांना मिळत आहे .

**सोशल मिडीयावरील स्वातंत्य**

सोशल मिडीया या समाज माध्यमावर कोणाचेही वर्चस्व नाही किंवा दबाव नाही त्यामुळे प्रत्येकालाच येथे व्यक्ती स्वातंर्त्यामुळे आपले मत मांडण्याचे स्वातंर्त्य आहे म्हणूनच समाज माध्यमांचा वापर स्मार्ट पद्धतीने केला गेला पाहीजे . विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवण्यासाठी त्याचा योग्य व नियंत्रित पद्धतीने उपयोग केला गेला पाहिजे.

प्रसारमाध्यमांद्वारे राष्ट्रीय चारिर्त्य निर्माण झाले पाहिजे. समाज माध्यमाद्वारे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा होईल असे कोणतेही कार्य विद्यार्थ्यांकडून होऊ नये ह्यासाठी त्यांना सोशल मिडीयाच्या योग्य वापरासंबंधी मार्गदर्शन केले गेले पाहिजे.

आजची पिढी ही अतिशय तल्लख बुद्धिमत्ता असलेली पिढी होय. त्यांच्या बुद्धिमत्तेचा वापर समाज माध्यमांच्या आधारे करून विद्यार्थी प्रगती करत आहे. युट्युबवर वेगवेगळे शैक्षणिक व्हिडीओ शिक्षक अपलोड करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून त्यांच्या अडचणी सोडवत आहेत. सोशल मिडियाद्वारे केवळ एका बोटाच्या आधारावर वर्गाच्या सर्व शारीरिक मर्यादा ओलांडून टाकल्या आहेत. ह्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यातील व्यक्तीशी आपला थेट संवाद होऊ शकतो. ह्याचा फायदा घेत विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजे.

**सोशल मिडीयाद्वारे शिक्षण**

समाज माध्यमांचा वेबीनार, झूम मिटिंग, तसेच वेबेक्स ह्या ॲप्सचा वापर वेगवेगळ्या व्याख्यानमालांचे आयोजन करता येते. शैक्षणिक व्याख्यानांच्या आयोजनाद्वारे विद्यार्थ्यांना नवनवीन माहिती मिळविता येते. समाज माध्यमाच्या वेगवेगळ्या ॲप्सद्वारे शैक्षणिक गुणवत्ता वाढ करून स्वताच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक व प्रभावीपणे वापर करून विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन करावे, तसेच सोशल मिडियामध्ये जग पालटून टाकण्याची ताकद आहे. तेव्हा त्याचा वापर करतांना तो काळजीपूर्वक झाला पाहिजे ह्याचे भान विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईल देणाऱ्या पालकांनाही असावयास हवे. सोशल मिडियावर कोणतीही पोस्ट टाकतांना तसेच मेसेज लाईक किंवा शेअर करतांना आपण काही चुकीची माहिती तर पाठवत नाही आहोत ना ह्याचे भानही विद्यार्थ्याना असावे . तसेच प्रत्येक येणाऱ्या नवीन माध्यमांची भूरळ प्रत्येकालाच पडते. पण त्या माध्यमांमध्ये कितपत वाहवत जावून त्याचा वापर कसा करायचा हे प्रत्येकाच्या हातात असते. संशोधनाद्वारे आलेले समाज माध्यम हे वाईटासाठी आलेले नाही तर त्याचा वापर उपयोग व्यक्ती कसा करतो हे महत्वाचे होय.

**सोशल मिडीया साक्षरता गरज**

सोशल मिडियाचा अती वापरही विद्यार्थ्यांना घातक ठरू शकतो. सोशल मिडियाचे जसे फायदे आहेत तसेच त्याचे दुष्परिणामही आहेत. अतीवापराचा घटक परिणाम आपल्या शरीरावर होऊन वेगवेगळ्या व्याधी होऊ शकतात

ह्याचेही ज्ञान विद्यार्थ्यांना देणे हे पालकांचे तसेच शिक्षकांचे कर्तव्य आहे. सोशल मिडियाच्या वापरामुळे जरी दुरावलेले नाते जवळ येत आहेत, परंतू विद्यार्थ्याचा कुटुंबातील संवादही कमी झालेला आढळून येतो.

सोशल मिडीयाचा वापर करतांना सायबर हल्ले रोखता आले पाहीजे .सोषल मिडीयावर नाममात्रतेमध्ये आपले फोटोज , माहिती ,कागदपत्रे , तसेच गोपनिय बाबी हल्ली सर्रास शेअर केले जाते .त्यामुळे अशा बाबीवर सायबर हल्ला होवू शकतो अशा प्रकारच्या बातम्या आपल्याला वाचायला मिळतात. म्हणून शिक्षणामध्ये सोषल मिडीयाचा वापर करतांना सोषल मिडीया प्रायव्हसी चा विचार केला पाहीजे . विविध अप्लीकेशनमधील सुरक्षितता समजून घेतली पाहीजे . तशीच एखादी माहिती सोषल मिडीयामनर शेअर करतांना दहा वेळा विचार करुनच माहिती शेअर करणे आज गरजेचे झाले आहे ह्याचा शिक्षणामध्ये विचार होणे आवश्यक आहे .

समाज माध्यम हे शिक्षणाचा प्रसार तसेच ज्ञानार्जन करण्याचे महत्वाचे माध्यम ठरले असले तरी त्याच्या सकारात्मक वापरणे चांगले विचार व नवनवीन माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे एक उपयुक्त माध्यम होय . .

**संदर्भग्रंथ सूची**

१. निताळे विनोद, भटकर सुधीर, सोरडे गोपी, (2017) माध्यमे आणि सामाजिक बदल य जळगाव, अथर्व पब्लिकेशन .

२. जोशी भालचंद्र (2000), नभोवाणी, नाशिक, य.च.म.मु.वि.

३. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रेय नागपूर, साईनाथ प्रकाशन.

४. अहेर हिरा, (1995) उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपूर, विद्याप्रकाशन

**५.** बामणे विष्णू, भारतीय शिक्षणाचेसमाजशास्त्रीय अधिष्ठान, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.